सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७७ | सोमवार, दि. २९ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४५०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३२०००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११०५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३१०/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे
अभीष्टचिंतन





श्री. जितेंद्र झाबक
माजी अध्यक्ष, खा. शि. मंडळ



श्री. जितेंद्र वाणी
अमळनेर



श्री. रवींद्र पाटील
पोलीस पाटील, बिलखेडा


# जेईई मेन परीक्षेत निर्भय साळुंखेला ९९.८ पर्सेंटाइल; आयआयटीला प्रवेशित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मारवड येथील मूळ रहिवासी निर्भय संदीपकुमार साळुंखे याने जेईई मेन परीक्षेत ९९.८ पर्सेंटाइल मिळविले आहेत. विशेष म्हणजे निर्भयला जेईई ॲडव्हान्स परीक्षेत संपूर्ण भारतात दोन हजार रँक मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर देशातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या दिल्ली येथील आयआयटीला तो नुकताच प्रवेशित झाला.

निर्भयने नुकत्याच झालेल्या सीईटी परीक्षेतही ९९.९ पर्सेंटाइल मिळविले आहेत. आयकर आयुक्त संदीपकुमार साळुंखे व स्पर्धा परीक्षा पुस्तकाच्या लेखिका सौ. मोनालीताई साळुंखे यांचा तो मुलगा आहे. त्याने मिळविलेले यश हे संपूर्ण तालुकाच नव्हे, तर खानदेशसाठी अभिमानास्पद बाब आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक आदिवासी विकास विभागाचे सहआयुक्त कपील पवार यांच्या हस्ते नुकताच निर्भयचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी आयकर आयुक्त साळुंखे, राज्य सैनिकी शाळा असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य उमेश काटे, डॉ. जी. व्ही. देसले, मारवड विकास मंचचे देवेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते.



अमळनेर : तालुक्यातील मारवड येथील मूळ रहिवासी निर्भय साळुंखे याने जेईई मेन परीक्षेत घवघवीत यश मिळविल्याने त्याचा विशेष सत्कार करताना नाशिक आदिवासी विकास विभागाचे सहआयुक्त कपील पवार. शेजारी आयकर आयुक्त संदीपकुमार साळुंखे, उमेश काटे, डॉ. जी. व्ही. देसले.

# श्री अंबरीश ऋषी टेकडी परिसरात क्लोरीन वायू वापरताना गळती

## पाणीपुरवठा यंत्रणेत बिघाड; ९०० किलो वायूची गळती

## पुढील ४८ तास टेकडी परिसरात न येण्याचे पालिका प्रशासनाचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री अंबरीश ऋषी टेकडी परिसरात पालिकेतर्फे रविवार, दि. २८ जून रोजी दुपारी पाणीपुरवठा यंत्रणास्थळी क्लोरीन वायू वापरला जात होता. मात्र, याचवेळी क्लोरीन वायूची मोठ्या प्रमाणावर गळती सुरू झाली. यामध्ये तब्बल ९०० किलो क्लारीन वायूची गळती झाली आहे. त्यामुळे श्री अंबरीश ऋषी टेकडी परिसरातील एक किलोमीटर परिसरात पर्यावरणप्रेमी, भाविक तसेच नागरिकांनी सोमवार, दि. २९ जून २०२६ रोजी रात्रीपर्यंत




जाऊ नये, अशी विनंती वजा आवाहन पालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

क्लोरीन वायू गळतीची माहिती मिळताच पालिकेच्या अग्नीशमन विभागाचे अधिकारी गणेश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली फायरमन दिनेश बिऱ्हाडे, वाहनचालक फारुक शेख, जफर पठाण, रफिक पठाण, आकाश संदानशीव, आकाश बाविस्कर आणि लखन कंखरे तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. दरम्यान, या घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू असून, परिसरातील हवेच्या गुणवत्तेवर देखील लक्ष ठेवण्यात येत असल्याचे समजते.




अमळनेर : येथील श्री अंबरीश ऋषी टेकडी परिसरात पालिकेतर्फे रविवार, दि. २८ जून रोजी दुपारी पाणीपुरवठा यंत्रणास्थळी क्लोरीन वायू गळती सुरू झाल्यानंतर तातडीने उपाययोजनेसाठी पोहोचलेले पालिकेचे अग्नीशमन विभागाचे अधिकारी, कर्मचारी.




### क्लोरीन वायूच्या संपर्कामुळे काय होतो त्रास?

क्लोरीन हा तीव्र स्वरूपाचा वायू असल्याने त्याच्या संपर्कामुळे श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची जळजळ होणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडणे तसेच इतरही आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात.



अमळनेर : येथील साने गुरुजी कन्या विद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती दिनी व्याख्यान देताना चेतन जाधव.

# युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे महापुरुषांच्या विचारांचा जागर

**राजर्षी शाहू महाराज जयंती दिनी ८५ वक्त्यांची विविध शाळांत व्याख्यान**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांची अंमलबजावणी त्यांच्या काळातच केली होती. ते आरक्षणाचे जनक होते. त्यांच्या कार्यामुळे भारतीय संविधानात समता आणि सामाजिक न्यायाचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले. मानवतेवर कलंक असलेली अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे, असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते. अशा कल्याणकारी राज्य निर्माण करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीदिनी त्यांच्या कार्याविषयी ८५ युवा वक्त्यांनी तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक, प्राथमिक शाळांमध्ये व्याख्यान दिले. येथील युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. गेल्या ५ वर्षांपासून युवा कल्याण प्रतिष्ठान महापुरुषांच्या विचारांचा जागर मोठ्या प्रमाणावर करीत आहे. शाहू महाराजांच्या जयंती दिनी मोहरमची सुटी असल्याने २५ व २७ जून रोजी शाळांमध्ये व्याख्यानांचा कार्यक्रम झाला.

युवा वक्त्यांच्या माध्यमातून सुमारे १८ हजार विद्यार्थ्यांपर्यंत शाहू महाराजांच्या कार्याविषयीची माहिती पोहोचली व सुमारे २५५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शाहू महाराजांवर शाळांमध्ये भाषणे केली. सदर व्याख्यानांच्या आयोजनात सर्व शाळांचे मुख्याध्यापक व वक्ते चेतन जाधव, अनिता बोरसे, डी. वाय. पाटील, डी. बी. पाटील, अशोक बिऱ्हाडे, आर. एम. देशमुख, संजीव पाटील, ॲड. रज्जाक शेख, डी. ए. पाटील, बापूराव ठाकरे, संजय पाटील, निवेदिता कापडणेकर, प्रा. अशोक पवार इत्यादींचा सहभाग होता. वक्त्यांच्या कार्यशाळेत प्रा. डॉ. राहुल निकम, प्रा. डॉ. लीलाधर पाटील यांनी मार्गदर्शन केले. तर सोपान भवरे लिखित शाहू महाराज जीवन व कार्य या वाचन साहित्याची युवा वक्त्यांना मदत झाली. आज सुमारे ३०० वक्ते युवा कल्याण प्रतिष्ठानाकडे आहेत. महात्मा ज्योतिराव फुले जन्मशताब्दीच्या वर्षात ५०० वक्ते निर्माण करण्याचा संकल्प युवा कल्याण प्रतिष्ठानने जाहीर केला आहे.



अमळनेर : येथील पालिकेच्या उपजिल्हा रुग्णालयात रविवार, दि. २८ जून रोजी पल्स पोलिओ मोहिमेचा प्रारंभ करताना पालिकेचे आरोग्य सभापती रामकृष्ण पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गोसावी, वैद्यकीय अधिकारी डॉ. महाजन, वैद्यकीय अधिकारी डॉ. शेलकर तसेच आरोग्य कर्मचारी.

# पल्स पोलिओ मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद; दुपारी १२ वाजेपर्यंत ४३ टक्के उद्दिष्ट पूर्ण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात रविवार, दि. २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेस प्रारंभ झाला. या मोहिमेंतर्गत संपूर्ण शहरात एकूण ७८ पोलिओ बूथ उभारण्यात आले असून, रेल्वेस्थानक व बसस्थानक येथे स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली आहेत. जेणेकरून एकही पात्र बालक पोलिओ डोसपासून वंचित राहू नये. तसेच दोन मोबाईल पथकांमार्फत शहरालगतच्या दुर्गम भागात जाऊन बालकांना पोलिओ डोस पाजण्याचे काम सुरू आहे. या मोहिमेसाठी शहरातील विविध बूथवर एकूण २३४ कर्मचारी कार्यरत असून, देखरेख व समन्वयासाठी १६ सुपरवायझर नियुक्त करण्यात आले आहेत.

शहरातील अपेक्षित लाभार्थी संख्या १२ हजार ९६२ इतकी असून, दुपारी १२ वाजेपर्यंत ५ हजार ६६१ बालकांना पोलिओ डोस पाजण्यात आला आहे. हे एकूण उद्दिष्टाच्या ४३ टक्के इतके काम पूर्ण झाल्याचे दर्शविते. मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी आरोग्य सभापती रामकृष्ण पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिरीश गोसावी, वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास महाजन, वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र शेलकर तसेच सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शहरातील रोटरी क्लब, लायन्स क्लब तसेच विविध शैक्षणिक संस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. याशिवाय नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, सर्व सभापती, नगरसेवक व नगरसेविका तसेच मुख्याधिकारी गणेश शिंदे यांचेही विशेष सहकार्य लाभले.

### मोकाट जनावरांचा त्रास

अमळनेर : येथील चोपडा रोडवरील पैलाड नाक्यानजीक मोठ्या प्रमाणावर दररोज म्हशी, गाई यांच्यासह मोकाट जनावरांचा मोठ्या प्रमाणावर नागरिकांसह वाहनचालकांना त्रास होत आहे. या रस्त्यावरून जळगाव, धरणगाव, पारोळा, चोपडा, या शहरांकडे मोठ्याप्रमाणावर सतत दुचाकीस्वारांसह चारचाकी तसेच अवजड वाहनांची वाहतूक दिवसरात्र सुरूच असते. याचवेळी मोकाट जनावरे रस्त्यावर थांबत असल्याने वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. पालिका प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# नगराध्यक्ष डॉ. बाविस्करांच्या कारला कन्नडनजीक वाहनाची जोरदार धडक


## पालिका नगरसेवक देशमुख जखमी; डॉ. बाविस्करांना किरकोळ दुखापत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या कारला समोरून येणाऱ्या एका चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. डॉ. बाविस्कर हे एका लग्नसोहळ्यासाठी जात असताना कन्नडजीक हा अपघात घडला, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपघातात



डॉ. परीक्षित बाविस्कर



महेश देशमुख

पालिकेतील नगरसेवक महेश देशमुख यांच्या छातीला मार लागला असून, त्यांना तातडीने धुळ्यातील सेवा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. मात्र, नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांना किरकोळ दुखापत झाली असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. अपघातानंतर घटनास्थळाच्या परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरू आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच अमळनेरमधील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी जखमींच्या प्रकृतीची विचारपूस केल्याचे सांगितले जात आहे.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात कोपरा वाचनालयाची स्थापना

## उपक्रमशील शिक्षक अनिल पाटील यांचा अभिनव उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नुकतीच कोपरा वाचनालयाची स्थापना करण्यात आली.

या कोपरा वाचनालयाचे उद्घाटन नवलभाऊ प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी डी. बी .पाटील यांनी केले. प्राचार्य पी. एम. कोळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून सीमा सुरक्षा बलाचे सेवानिवृत्त अधिकारी मुरलीधर आत्माराम बाविस्कर,

पान २ वर



अमळनेर : येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नुकतीच कोपरा वाचनालयाची स्थापना करण्यात आली. यावेळी उपस्थित नवलभाऊ प्रतिष्ठानचे प्रशासकीय अधिकारी डी. बी .पाटील, प्राचार्य डॉ. शेख, प्रा. डॉ. चव्हाण, ॲड. अरुण पाटील, प्रा. डॉ. निकम, प्रा. साळुंके, प्रा. पाटील व उपक्रमशील शिक्षक अनिल पाटील आदी.


अभीष्टचिंतन



श्री. जितेंद्र झाबक
*कार्याध्यक्ष*
राष्ट्रवादी काँग्रेस, अमळनेर शहर
*माजी अध्यक्ष *
खा. शि. मंडळ, अमळनेर

आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

* शुभेच्छुक *



श्री. संभाजी पाटील
अध्यक्ष – शेतकी संघ, अमळनेर



श्री. राजू फापोरेकर
नगरसेवक – न.पा., अमळनेर

## संपादकीय

# भारताला संधी

अमेरिकेने इराणवरील तेल निर्बंधांना ६० दिवसांची अंशतः स्थगिती देण्याचा घेतलेला निर्णय जागतिक ऊर्जा बाजाराची समीकरणे बदलणारा एक मोठा धक्का आहे. स्वित्झर्लंडमध्ये पाकिस्तान आणि कतारच्या मध्यस्थीने झालेल्या गुप्त वाटाघाटींनंतर अमेरिकेने घेतलेली ही माघार आंतरराष्ट्रीय राजकारणातील काहीही कायम नसते, या नियमाला अधोरेखित करते. पण या सगळ्या गदारोळात सर्वांत मोठा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे या बदललेल्या चित्राचा भारतावर काय आणि कसा परिणाम होणार? प्रथमदर्शनी हा निर्णय भारतासारख्या प्रचंड इंधन दुर्भिक्ष्य असलेल्या देशासाठी एक मोठा दिलासा मानला जात आहे. भारत आपल्या गरजेच्या तब्बल ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो, ही आता सगळ्यांनाच माहिती आहे. भारताची एकूणच गती या आयातीत इंधनावर अवलंबून आहे. त्यामुळेच जागतिक बाजारात इंधनाच्या संदर्भात कोणता नवा निर्णय अथवा नियम होत असेल तर तो भारतासाठी सर्वोच्च महत्त्वाचा असतो. तेलाचा एक नवा मोठा स्रोत उपलब्ध होणे ही भारतासाठी आनंदाचीच बातमी असायला हवी. फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या अमेरिका-इराण संघर्षामुळे कच्च्या तेलाचे भाव प्रति बॅरल ११४ डॉलर्सपर्यंत भडकले होते, ते आता ७२ डॉलर्सच्या खाली आले आहेत. ही नवी घडामोड देशांतर्गत महागाईने होरपळणाऱ्या भारतीय जनतेसाठी आणि वित्तीय तुटीशी झगडणाऱ्या सरकारसाठी ही पडती बाजू सावरणारी ठरू शकते. इराण आणि भारताचे व्यापारी संबंध जुने आणि घट्ट आहेत. किमान युद्ध सुरू होण्याच्या अगोदरपर्यंत तशी स्थिती होती व युद्धानंतरही त्यात फारसा बदल झालेला नाही. फार लांबचे नाही मात्र साधारण दीड दशकापूर्वी असे चित्र होते, की भारत इराणकडून १४ टक्के तेल आयात करत होता आणि तो भारताचा दुसरा सर्वांत मोठा तेल पुरवठादार होता. परंतु अमेरिकेच्या वाढत्या दबावामुळे आणि निर्बंधांमुळे भारताला इराणकडून होणारी आयात टप्प्याटप्प्याने कमी करावी लागली. २०१९ मध्ये ट्रम्प प्रशासनाच्या पहिल्या टर्ममध्ये तर भारताने इराणकडून तेल घेणे पूर्णपणे थांबविले. यानंतर भारताने आपल्या रणनीतीत बदल केला. रशिया- युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर भारताने संधी साधत रशियाकडून स्वस्त दरात तेल खरेदी सुरू केली.

भारताच्या एकूण आयातीपैकी ४० टक्के तेल एकट्या रशियातून येत होते, असे आकडेवारी सांगते. उर्वरित गरज सौदी अरेबिया, इराक आणि यूएईसारखे ओपेक देश भागवतात. पण या आखाती देशांवर अति-अवलंबित्व असण्याचे धोके नुकत्याच झालेल्या अमेरिका-इराण युद्धादरम्यान भारताने अनुभवले आहेत. पुरवठा विस्कळीत झाला की देशात पेट्रोल-डिझेल महागते आणि पर्यायाने सर्वच वस्तूंचे भाव गगनाला भिडतात. आता इराणच्या नॅशनल इराणी ऑइल कंपनीने भारतीय रिफायनर्सशी संपर्क साधून व्यापारी संबंध पुनरुज्जीवित करण्याची तयारी दर्शविली आहे. यामुळे भारतीय तेल कंपन्यांना रशिया आणि सौदी अरेबियासारख्या इतर पुरवठादारांशी दरांबाबत आपल्याला परवडेल अशा प्रकारे व्यवहार करण्यास एक संधी मिळाली आहे. अर्थात सध्याच्या जागतिक घडामोडी पाहता सगळे दिसते तितकेच सहज आणि सोपे असण्याची शक्यता अजिबात नाही. तो केवळ एक आशेचा किरण असतो व त्याचे प्रत्यक्षात रूपांतर होण्याची अपेक्षा असते. भारतीय तेल कंपन्यांनी इराणकडून तेल खरेदी करण्यासाठी अद्याप कोणतीही घाई दाखविलेली नाही, ही वस्तुस्थिती अतिशय बोलकी आहे. या 'थांबा आणि वाट पाहा' धोरणामागे काही निश्चित अशी कारणे आहेत. यातील सगळ्यांत प्रमुख आणि महत्त्वाचे म्हणजे अमेरिकेने दिलेली सवलत केवळ ६० दिवसांची (२१ ऑगस्टपर्यंत) आहे. तेल व्यापारासारख्या दीर्घकालीन आणि अब्जावधी डॉलर्सच्या व्यवहारात इतक्या कमी कालावधीच्या सवलतीवर विसंबून मोठे निर्णय घेता येत नाहीत. जरी अमेरिकेने निर्बंध शिथिल केले असले, तरी प्रत्यक्षात डॉलर्समध्ये व्यवहार करताना जागतिक बँका किती सहकार्य करतील, याबाबत अद्याप संदिग्धता आहे.

उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ असे सांगतात, की इराण ज्या बाजारात परतत आहे तो २०१८ चा बाजार नाही. दरम्यानच्या काळात बरेच पाणी वाहून गेले आहे. अमेरिकेची मोठी आडकाठी असली तरी आज बाजारात रशियन तेलाचा मोठा पर्याय भारताला उपलब्ध आहे, तेथून भारताला सवलतीच्या दरात तेल मिळू शकते. इराणला बाजारात स्वतःचे स्थान पुन्हा मिळविण्यासाठी कठोर स्पर्धा करावी लागेल. चीन आधीच इराणकडून स्वस्तात तेल खरेदी करत आला आहे. आता या तेलाच्या विक्रीचा मार्ग वैध झाल्यावर चीनची भूक आणखी वाढेल. अशा वेळी इराण भारताला किती आकर्षक दराने तेल देतो, यावरच भारताची खरेदी अवलंबून असेल. भारतासाठी हा काळ संधी साधण्याचा नक्कीच आहे. तथापि, इराणकडून मिळणारे तेल हे कायमस्वरूपी स्रोत असल्याचे मानण्याऐवजी तूर्त एक पर्यायी पुरवठा म्हणून याकडे पाहिले पाहिजे, जेणेकरून कच्च्या तेलाचा खर्च मर्यादित ठेवता येईल. थोडक्यात सांगायचे तर, अमेरिकेने इराणला दिलेली ही सवलत भारतासाठी आर्थिकदृष्ट्या फायद्याची नक्कीच आहे; पण सावधगिरीही बाळगावी लागेल. कारण आंतरराष्ट्रीय राजकारणात ट्रम्प यांच्या अमेरिकेच्या धोरणांवर पूर्ण विश्वास ठेवणे कदाचित आत्मघातकी ठरू शकते. आज सवलत देणारी अमेरिका उद्या पुन्हा निर्बंध लादणार नाही, याची शाश्वती कोण देणार? त्यामुळे इराणच्या तेलाचे स्वागत जरूर करावे, पण रशिया आणि आखाती देशांशी असलेले संबंध बिघडणार नाहीत, याची काळजी घेत भारताला संतुलित भूमिका निभवावी लागेल. अन्यथा जागतिक शक्तींच्या या खेळात भारताचे तेल हित धोक्यात येण्यास वेळ लागणार नाही.

# आकाशात उडणाऱ्या विमानामागे पांढरी रेषा का तयार होते?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेव्हा आपण निरभ्र आकाशात एखादे विमान उडताना पाहतो तेव्हा त्याच्यामागे एक पांढरी रेषा नक्कीच दिसून येते. अनेकदा ही रेषा काही सेकंदांत नाहीशी होते, तर कधी-कधी ती कित्येक मिनिटांपर्यंत आकाशात तशीच राहते. हे पाहून लोकांच्या मनात एकच प्रश्न येतो, की हा धूर आहे की आणखी काही? याबद्दलची सविस्तर माहिती जाणून घेऊ.

आजच्या काळात आपल्या सर्वांनाच विमानाने प्रवास करायला आवडते. प्रवास करण्याचा हा एक आरामदायक पर्याय आहे. यामुळे आपण हजारो किलोमीटरचे अंतर काही वेळातच पार करतो. मात्र, जेव्हा आपण आकाशात उडणारे विमान पाहतो तेव्हा त्याच्यामागे लांब पांढऱ्या रेषा नक्कीच दिसते. काही वेळा ही रेषा काही सेकंदांतच नाहीशी होते, तर काही वेळा ती कित्येक मिनिटांपर्यंत तशीच राहते.

काही लोक याला धूर समजतात, तर काही जण याबद्दल वेगवेगळ्या गोष्टी सांगतात. पण तुम्हाला माहीत आहे का, की ही पांढरी रेषा नेमकी का तयार होते? वास्तविक यामागे एक वैज्ञानिक कारण दडले आहे. आज आम्ही तुम्हाला या रेषा तयार होण्यामागचे कारण सांगणार आहोत.



### काय असते ही पांढरी रेषा?

सर्वांत आधी आपण हे जाणून घेऊया की विमानामागे तयार होणाऱ्या या पांढऱ्या रेषेला काय म्हणतात? इंग्रजीत या रेषेला 'कॉन्ट्रेल' म्हटले जाते. 'कॉन्ट्रेल'चे पूर्ण नाव 'कंडेन्सेशन ट्रेल' असे आहे. याचा अर्थ हवेतील आर्द्रतेमुळे (नमी) तयार होणारी पांढऱ्या वाफेची रेघ.

### ही रेषा कशी तयार होते?

विमानाचे इंजिन जेव्हा सुरू असते, तेव्हा त्याच्या सायलेन्सरमधून उष्ण वायूंसोबतच वाफही बाहेर पडते. जेव्हा विमान खूप उंचावर उडत असते, तेव्हा तिथल्या आकाशात कडाक्याची थंडी असते (तेथील तापमान उणे म्हणजेच मायनस असते). अशा अत्यंत थंड हवेत जेव्हा इंजिनमधून निघणारी ती उष्ण वाफ अचानक बाहेर येते, तेव्हा प्रचंड थंडीमुळे तिचे लगेचच बर्फाच्या तुकड्यांमध्ये रूपांतर होते. हेच गोठलेले बर्फाचे लहान कण एकत्र येऊन खालील बाजूस आपल्याला पांढऱ्या रेषेसारखे दिसतात.

### हा धूर असतो का?

बहुतेक लोक याला धूरच समजतात, पण तसे नाही. वास्तविक, हे अगदी तसेच आहे जसे हिवाळ्यात तुमच्या तोंडातून निघणारा श्वास पांढरा दिसतो. तिथेही गरम हवा जेव्हा थंड वातावरणाला मिळते, तेव्हा पाण्याचे लहान कण तयार होतात.

### ती लगेच का नाहीशी होते?

काही विमानांच्या मागे बनलेली पांढरी रेषा काही वेळातच नाहीशी का होते, हे तुम्ही पाहिले असेल. जेव्हा आजूबाजूची हवा कोरडी असते, तेव्हा असे घडते. कोरड्या हवेत बर्फाचे लहान कण लवकर विरघळतात आणि रेषाही नाहीशी होते.

### काही वेळा ती जास्त वेळ का टिकून राहते?

जर उंचावरील हवेत आर्द्रता (नमी) जास्त असेल, तर ही पांढरी रेषा दीर्घकाळापर्यंत राहू शकते. अनेकदा ती पसरून ढगांसारखीही दिसू लागते. याच कारणामुळे काही कॉन्ट्रेल्स आकाशात बऱ्याच वेळात स्पष्ट दिसतात.

### विमानांच्या मागे अशा रेषा तयार होतात का?

प्रत्येक वेळी असे घडत नाही. विमान किती उंचावर उडत आहे, त्या वेळेस तिथले तापमान किती आहे आणि हवेतील आर्द्रता किती आहे, यावर हे अवलंबून असते.

### विमान किती उंचावर उडते?

व्यावसायिक प्रवासी विमाने साधारणपणे ३० हजार ते ४० हजार फूट (सुमारे ९ ते १२ किलोमीटर) उंचीवर उडतात. आता तुमच्या मनात असा प्रश्न येत असेल, की खाली जमिनीवर इतकी उष्णता असताना वरचे तापमान मायनसमध्ये कसे जाते? वास्तविक एवढ्या उंचीवर उन्हाळ्याच्या दिवसांतही तापमान उणे ४० ते ६० अंशांपर्यंत असते. त्यामुळे खाली जरी जूनची कडक उन्हाळा असला, तरी तितक्या उंचीवर विमानाची वाफ लगेच बर्फात बदलते आणि आपल्याला उन्हाळ्यातही ही पांढरी रेषा (कॉन्ट्रेल) दिसते.

# १९ वर्षांचा मुलगा कमवतो महिन्याला एक कोटी

## आयुष सिंह नेमके करतो तरी काय?

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोशल मीडियावर सध्या आयुष सिंह या १९ वर्षांच्या तरुणाची चांगलीच चर्चा रंगली आहे. त्याची कहाणी अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. कारण आयुषने कोणतीही मोठ्या कॉलेजची पदवी किंवा श्रीमंत पार्श्वभूमी नसताना स्वतःच्या बळावर कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व्यवसाय उभा केला आहे, यातून तो दरमहा सुमारे एक कोटी रुपये कमावतो. आयुषची ही प्रेरणादायी कहाणी टॉपमेटचे सह-संस्थापक आणि सीटीओ दिनेश सिंह यांनी लिंक्डइनवर शेअर केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊया.

दिनेश सिंह यांनी आयुषची स्टोरी शेअर करताना सांगितले की, आयुष ना आयआयटीमधून पदवीधर आहेत, ना एमआयटीमधून. 'कोरोना'च्या काळात आयुष अवघा १३ वर्षांचा होता, त्यावेळी त्याचे कुटुंब आर्थिक संकटात होते. त्यावेळी आयुषकडे फक्त एक जुना लॅपटॉप, कसेबसे चालणारे इंटरनेट कनेक्शन आणि काही जुने ऑनलाइन कोर्सेस होते. मात्र, काहीतरी नवीन शिकण्याची जिद्द त्यांच्यात होती. याच जिद्दीच्या जोरावर त्याने एआयचा महत्त्वाचा भाग असलेले मशीन लर्निंग शिकून घेतले.



### १४ व्या वर्षी एमआयटीकडून कौतुक

आयुषला त्याच्या मेहनतीचे फळ लवकरच मिळाले. काही महिन्यांतच तो परदेशी स्टार्टअप्ससोबत काम करू लागला. तो केवळ १४ वर्षांचे असताना जगातील प्रतिष्ठित संस्था एमआयटी (मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) ने त्याने तयार केलेल्या कोर्सचे कौतुक केले आणि लोकांना ते शिकण्याची शिफारस केली.

### हजारो तरुणांना प्रशिक्षण

सुरूवातीला आयुषला आपल्या कामासाठी खूप कमी पैसे मिळत असत. कालांतराने त्याने कोडिंग आणि मशिल लर्निंगचे आपले ज्ञान लोकांसमोर कसे मांडायचे हे शिकून घेतले, त्यामुळे त्याच्या कमाईत वाढ झाली. आज आयुष टॉपमेट प्लॅटफॉर्मवर एआय विषयावरील प्रीमियम कोर्सेस चालवतो आणि हजारो तरुणांना प्रशिक्षण देतो.

### टॅलेंट असते पण व्यवसाय कसा करायचा हे माहीत नसते

दिनेश सिंह यांनी या कथेद्वारे एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. त्यांच्या मते आज इंटरनेटवर अनेक लोकांकडे चांगली कौशल्ये आहेत, ज्यासाठी लोक पैसे द्यायलाही तयार असतात. मात्र, अनेकांना आपल्या कौशल्याचे व्यवसायात रूपांतर कसे करायचे किंवा त्यातून उत्पन्न कसे मिळवायचे हे माहीत नसते. त्यामुळे अनेकांना पैसे कमावण्यात अडचणी येत आहेत.



# गूळ चिकट होतोय?

## मसाल्याची ही दोन पाने डब्यात टाका अन् पाहा कमाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गूळ आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असून साखर ऐवजी एक निरोगी पर्याय म्हणून आणि भाज्यांमध्ये चव वाढविण्यासाठी वापरला जातो.

अनेकदा हवाबंद डब्यात ठेवूनही हवा आणि आर्द्रतेमुळे (नमी) गूळ चिकट होतो, वितळतो किंवा त्याला बुरशी लागते. काही सोपे किचन हॅक्स वापरून तुम्ही गुळाला वर्षभर अगदी फ्रेश, कोरडा आणि खराब न होता सुरक्षित ठेवू शकता. गूळ डब्यात भरण्यापूर्वी तो एका स्वच्छ, सुक्या आणि पांढऱ्या सुती (कॉटन) कपड्यात व्यवस्थित गुंडाळून ठेवावा. सुती कपडा डब्यातील सर्व ओलसरपणा शोषून घेतो आणि गुळाला मऊ किंवा ओले होण्यापासून वाचवतो.

गुळाच्या डब्यात २ ते ३ सुकी तेजपत्ता (तमालपत्र) टाकावीत; हे ओलसरपणा शोषून घेतात आणि याच्या वासाने मुंग्याही दूर राहतात. गुळाला बुरशी लागण्यापासून वाचवण्यासाठी डब्यामध्ये हळकुंडाचे (सुकी हळद) १ ते २ तुकडे ठेवावेत, यामुळे गूळ दीर्घकाळ चांगला राहतो. जर गूळ थोडा मऊ किंवा चिकट झाला असेल, तर तो डब्यातून काढून काही तास कडक उन्हात वाळवावा. उन्हामुळे गुळातील ओलसरपणा पूर्णपणे निघून जातो आणि तो पुन्हा घट्ट होतो. त्यानंतर तो स्वच्छ सुक्या डब्यात भरून ठेवावा.



# दातांच्या मजबुतीसाठी कोणते पदार्थ सर्वोत्तम?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दातांच्या आरोग्यासाठी आणि मजबुतीसाठी तुमचा आहार अत्यंत महत्त्वाचा असतो. जाणून घ्या कोणते १० पदार्थ तुमच्या दातांसाठी वरदान आहेत.

### दूध आणि दुग्धजन्य पदार्थ

दूध, दही आणि चीजमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस भरपूर असते. हे घटक दातांचे इनॅमल सुरक्षित ठेवून दात मजबूत करण्यास मदत करतात.

### पालेभाज्या (पालक आणि मेथी)

पालक आणि इतर हिरव्या पालेभाज्यांमध्ये कॅल्शियम आणि फायबर भरपूर असतात. हे दात स्वच्छ ठेवतात आणि हिरड्यांचे आरोग्य उत्तम राखतात.

### सफरचंद आणि नाशपाती

सफरचंद आणि नाशपाती चावल्यामुळे लाळ तयार होते, जी तोंडातील ॲसिड आणि बॅक्टेरिया कमी करण्यास मदत करते. हे नैसर्गिक टूथब्रशसारखे काम करतात.

### बदाम आणि अक्रोड

ड्रायफ्रूट्समध्ये प्रथिने आणि कॅल्शियमचा मोठा साठा असतो. बदाम आणि अक्रोडचे सेवन दातांच्या मजबुतीसाठी आणि हिरड्यांच्या आरोग्यासाठी उत्तम आहे.

### गाजर आणि काकडी

कच्ची गाजरे आणि काकडी खाल्ल्याने दात नैसर्गिकरित्या घासले जातात. यातील खनिजे दातांना मजबूत बनवतात आणि हिरड्यांचा व्यायाम होतो.

### मासे (ओमेगा-३ युक्त)

साल्मनसारख्या माशांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स आणि व्हिटॅमिन डी असते, जे शरीराला कॅल्शियम शोषून घेण्यास आणि दात मजबूत करण्यास मदत करते.

### पाणी-सर्वोत्तम पेय

पाणी पिणे हे दातांच्या आरोग्यासाठी सर्वात सोपा उपाय आहे. हे तोंडात अन्नाचे कण राहू देत नाही आणि दातांची झीज होण्यापासून वाचवते.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात कोपरा वाचनालयाची स्थापना

**पान १ वरून :** प्राचार्य डॉ. एस .जे. शेख, प्रा. डॉ. कैलास चव्हाण, ॲड. अरुण पाटील, प्रा. डॉ. राहुल निकम, प्रा. एस. एस. साळुंखे, प्रा. एस. एस. पाटील उपस्थित होते. यावेळी डी .बी. पाटील यांनी अनिल पाटील यांच्या संकल्पनेचा व कार्याचा गौरव करून अशी कोपरा वाचनालयाची संकल्पना संस्थेच्या सर्व शाळांमध्ये राबविण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे सांगत उपक्रमशील शिक्षक अनिल पाटील यांच्या कार्याचा गौरव केला व सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. यावेळी चतुर पाटील, कल्याण नेरकर, किरण पाटील, आर. आर. पाटील, नितीन पाटील, विजेंद्र गवळे, दीपक पाटील, समाधान पाटील, हर्षल बेहरे, सौ. रूपालीताई पाटील, सौ. नीलिमाताई पाटील, अविनाश बाविस्कर आदींसह ग्रंथपाल सौ. जागृतीताई पाटील, उपग्रंथपाल सौ. देवयानीताई पाटील, सौ. अर्चनाताई पाटील यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. सुनील वाघ यांनी सूत्रसंचालन केले. गोपाल हाडपे यांनी आभार मानले.

# पल्स पोलिओ दिनानिमित्त पाजला १४० बालकांना प्रतिबंधक डोस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राष्ट्रीय पल्स पोलिओ दिनानिमित्त शनिवार, दि. २८ जून रोजी शहरातील न्यू प्लॉट परिसरातील डॉ. चव्हाण हॉस्पिटलमध्ये १४० बालकांना प्रतिबंधक डोस पाजण्यात आला. या कार्यक्रमास नगरसेविका सौ. कल्पनाताई शर्मा तसेच मुन्नाभाऊ शर्मा उपस्थित होते.

यावेळी शर्मा दाम्पत्याने आरोग्य विभागाच्या कार्याचे कौतुक करत पोलिओ निर्मूलनासाठी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित केले. हॉस्पिटलमधील परिचारिका जोशीताई व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने दुपारी दोन वाजेपर्यंत एकूण १४० बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस पाजण्यात आले.
दरम्यान, शहरातील सर्व वॉर्डांमध्येही पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात आली. बालकांच्या उज्ज्वल आणि निरोगी भविष्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या मुलांना वेळेवर पोलिओचे डोस पाजणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.



***भारती आचरेकर ' सिरीयलमधला जोक '***

*'वागळे की दुनिया'च्या सेटवर तिने*
*डायरेक्टरला विचारलं,*
*आज माझे रडायचे आहे का?*
*तो म्हणाला, की*
*नाही, आज तुम्ही सगळ्यांना हसवणार.*
*ती म्हणाली, की*
*मग आज मी खरी ' आजी ' होणार.*
*निष्कर्ष : मराठी कलाकार फक्त अभिनय करत नाहीत. ते हास्याची परंपरा जीवंत ठेवतात. त्यांचा विनोद हा फक्त मनोरंजन नाही. तो मराठी संस्कृतीचा आत्मा आहे. हसू, विनोद आणि निरागसता हेच त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य आहे.*

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# विवाहितांनी सकाळी उठल्यावर सर्वप्रथम काय करावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वटपौर्णिमेचे व्रत हे सुवासिनींसाठी अत्यंत पवित्र आणि सौभाग्यदायी मानले जाते. या व्रताची सुरूवात सकाळी उठल्यापासूनच शास्त्रोक्त पद्धतीने होणे गरजेचे आहे. वटपौर्णिमेच्या दिवशी विवाहित महिलांनी सकाळी उठल्यावर सर्वप्रथम कोणत्या गोष्टी कराव्यात, याबद्दल शास्त्र काय सांगते ते खालीलप्रमाणे आहे.

### करदर्शन आणि भूमी वंदन

सकाळी डोळे उघडल्या-उघडल्या अंथरुणावर असतानाच सर्वप्रथम आपल्या दोन्ही हातांच्या तळव्यांचे दर्शन घ्यावे (कराग्रे वसते लक्ष्मी... या मंत्राचा जप करावा). त्यानंतर जमिनीवर पाऊल ठेवण्यापूर्वी धरती मातेला (भूमातेला) स्पर्श करून तिची क्षमा मागावी आणि वंदन करावे. दिवसाची सुरूवात सकारात्मक ऊर्जेने होण्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

### मन:पूर्वक संकल्प आणि पतीचे मुखदर्शन

उठल्यानंतर मनातल्या मनात किंवा प्रत्यक्ष पतीचे मुखदर्शन घ्यावे आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी ईश्वराकडे प्रार्थना करावी. मनात कोणताही राग किंवा नकारात्मक विचार न आणता, आजचे वटसावित्री व्रत मी मनोभावे आणि आनंदाने पूर्ण करणार आहे, असा मनात संकल्प करावा.

### मंगल स्नान


सूर्योदयापूर्वी किंवा सकाळी लवकर उठून घराची स्वच्छता करावी आणि त्यानंतर स्नान करावे. वटपौर्णिमेच्या दिवशी स्नानाच्या पाण्यात थोडे गंगाजल किंवा तुळशीचे पान टाकून स्नान करणे अधिक शुभ मानले जाते. या दिवशी केस धुवून स्नान करण्याची परंपरा आहे.

### सुवासिनीची पारंपरिक वेशभूषा

स्नान आटोपल्यानंतर महिलांनी सौभाग्याची चिन्हे परिधान करावीत.
शुभ रंग : या दिवशी लाल, हिरवी, पिवळी किंवा गुलाबी यांसारख्या शुभ रंगाची साडी किंवा पोशाख परिधान करावा. (चुकूनही काळ्या किंवा पांढऱ्या रंगाचे कपडे घालू नयेत).
सौभाग्य अलंकार : कपाळावर कुंकू किंवा टिकली लावावी, गळ्यात मंगळसूत्र, हातात हिरव्या बांगड्या आणि पायात जोडवी नक्की घालावीत.

### घरातील देवपूजा आणि उंबरठा पूजन

वटवृक्षाच्या पूजेला जाण्यापूर्वी आपल्या घरातील देव्हाऱ्याची नियमित पूजा करावी. कुलदेवी, कुलदेवता आणि गणपती बाप्पाची पूजा करून त्यांना दिवा-अगरबत्ती दाखवावी. त्यानंतर घराच्या मुख्य उंबरठ्याला (चौकटीला) हळद-कुंकू लावून नमस्कार करावा, जेणेकरून घरात सुख-समृद्धी राहील. ही सर्व तयारी आटोपल्यानंतर पूजेचे ताट (ज्यामध्ये हळद-कुंकू, अक्षता, सुती धागा, ताजी फळे, पाच प्रकारची धान्ये आणि वाण) तयार करावे आणि त्यानंतरच वटवृक्षाची (वडाच्या झाडाची) पूजा करण्यासाठी घराबाहेर पडावे.



# वटसावित्री पौर्णिमा पूजेचा शुभ मुहूर्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वटसावित्री पौर्णिमा पूजेचा २९ जून २०२६ रोजी सकाळी ०६:३० ते दुपारी १२:३० या वेळेत सर्वोत्तम मुहूर्त आहे.



### पूजेसाठी लागणारे साहित्य

करून ठेवाव्यात. हळद-कुंकू, अक्षता, आणि फुले. सुती पांढरा धागा किंवा रील (सूत फेऱ्या मारण्यासाठी). ५ प्रकारची फळे (विशेषत: आंबा, फणस, जांभूळ, केळी, शिकेकाई किंवा इतर ऋतुफळे). देवासाठी विड्याची पाने आणि सुपारी. ओटी भरण्यासाठी खण आणि नारळ. बांबूची छोटी सुपे (वाण देण्यासाठी - यात हरभरे, फळे ठेवली जातात). धूप, दीप (निरांजन) आणि कापूर.

### संपूर्ण पूजा विधी

सकाळी लवकर उठून स्नान करावे. या दिवशी सुवासिनी महिलांनी छान नटून-थटून, हिरव्या बांगड्या आणि पारंपरिक पोषाख (साडी) परिधान करून पूजेची तयारी करावी.

### वडपूजा व अभिषेक

वडाच्या झाडाजवळ (किंवा घरात कुंडीत लावलेल्या वडाजवळ) जाऊन जागा स्वच्छ करावी. झाडाच्या मूळाशी किंवा खोडापाशी हळद-कुंकू वाहावे, अक्षता आणि फुले अर्पण करावीत.

### नैवेद्य आणि ओटी भरणे

सावित्री आणि सत्यवान यांच्या स्मृतीला वंदन करून वडाला ऋतुफळे आणि विड्याचे पान-सुपारी अर्पण करावी. सूतात भिजवलेले आंबे किंवा पाण्याचा नैवेद्य दाखवावा. त्यानंतर वडाची खण-नारळाने ओटी भरावी.

### प्रदक्षिणा आणि सूत गुंडाळणे

हातात पांढरा सुती धागा घेऊन वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घालावी. प्रदक्षिणा घालताना तो धागा वडाच्या खोडाला गुंडाळायचा असतो. शास्त्रानुसार कमीत कमी ७ फेऱ्या किंवा इच्छेनुसार १०८ फेऱ्या माराव्यात. शेवटी निरांजनाने वडाला ओवाळून आरती करावी. घरी आल्यावर किंवा मंदिराच्या ठिकाणी इतर सुवासिनींना बांबूच्या सुपात हरभरे आणि फळे ठेवून 'वाण' द्यावे आणि एकमेकींना सौभाग्यवती भव असा आशीर्वाद द्यावा.

### वटपौर्णिमेची प्रार्थना

**अवैधव्यं च सौभाग्यं देहि त्वं मम सुव्रते।**
**पुत्रान् पौत्रांश्च सौख्यं च गृहाणार्घ्यं नमोऽस्तु ते॥**

**मराठीत सोपा अर्थ :** 'हे सावित्री देवी, हे वटवृक्षा! मला अखंड सौभाग्य आणि दीर्घायुष्य लाभू दे. माझ्या संसारात सुख, समृद्धी आणि संततीचे सुख नांदू दे. माझे हे अर्घ्य (पूजा) स्वीकार कर, तुला माझा नमस्कार असो.'
जर हा श्लोक म्हणता येत नसेल, तर साध्या मराठीत 'मला आणि माझ्या पतीला उत्तम आरोग्य लाभू दे, आमचा संसार सुखाचा होऊ दे आणि जन्मोजन्मी हाच पती मिळू दे' अशी प्रार्थना वडाला मनोभावे करावी.

# वटपौर्णिमा आरती

अश्वपती पुसता झाला।। नारद सागंताती तयाला।।
अल्पायुषी सत्यवंत।। सावित्री ने कां प्रणीला।।
आणखी वर वरी बाळे।। मनी निश्चय जो केला।।
आरती वडराजा।।१।।
दयावंत यमदूजा। सत्यवंत ही सावित्री।
भावे करीन मी पूजा। आरती वडराजा ।।धृ।।
ज्येष्ठमास त्रयोदशी। करिती पूजन वडाशी ।।
त्रिरात व्रत करूनीया। जिंकी तू सत्यवंताशी।
आरती वडराजा ।।२।।
स्वर्गावारी जाऊनिया। अग्निखांब कचळीला।।
धर्मराजा उचकला। हत्या घालिल जीवाला।
येश्र गे पतिव्रते। पती नेई गे आपुला।।
आरती वडराजा ।।३।।
जाऊनिया यमापाशी। मागतसे आपुला पती।
चारी वर देऊनिया। दयावंता द्यावा पती।
आरती वडराजा ।।४।।
पतिव्रते तुझी कीर्ती। ऐकुनि ज्या नारी।।
तुझे व्रत आचरती। तुझी भुवने पावती।।
आरती वडराजा ।।५।।
पतिव्रते तुझी स्तुती। त्रिभुवनी ज्या करिती।। स्वर्गी पुष्पवृष्टी करूनिया।
आणिलासी आपुला पती।। अभय देऊनिया। पतिव्रते तारी त्यासी।।
आरती वडराजा ।।६।।

# वटपौर्णिमा व्रताचा सोपा विधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**वटपौर्णिमा व्रताचा विधी व पूजेसाठी लागणारे साहित्य पुढीलप्रमाणे-**

- सावित्री आणि सत्यवानाची मूर्ती
- धूप- दीप-उदबत्ती
- तूप
- पाच प्रकारची फळं (सफरचंद, केळी, संत्री, मोसंबी, चिकू)
- फुले
- दिवा
- वडाला गुंडाळण्यासाठी पांढरा मोठा धागा
- पाणी भरलेला लहान कलश
- हळद - कुंकू
- पंचामृत (तूप, दही, दूध, मध आणि साखर यांचे मिश्रण एका वाटीत घालून एकत्र करणे)
- हिरव्या बांगड्या
- शेंदूर
- एक गळसरी (काळी पोत)
- अत्तर
- कापूर

**पूजेचे वस्त्र**

- विड्याचे पाने
- सुपारी
- सुटे पैसे
- गूळ- खोबऱ्याचा नैवेद्य
- आंबे
- दूर्वा
- गहू

**पूजा विधी**

- सकाळची नित्यकर्म उरकल्यानंतर सुवासिनींनी सौभाग्यलंकार परिधान करावे.
- सौभाग्यवती स्त्रीने 'मला आणि माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभो', असा संकल्प करावा.
- वडाखाली चौरंग मांडून ही पूजा करावी.
- प्रथम सुपारीच्या गणपती बाप्पांची स्थापना करावी.
- गणपती बाप्पांची हळद-कुंकू-अक्षता वाहून पंचोपचार पूजा करावी.
- सतीमातेंच्या मूर्ती किंवा मूर्ती उपलब्ध नसल्यास इतर अजून एक सुपारीची पण पंचोपचार पूजा करावी.
- हळदी-कुंकू, काळी पोत, हिरव्या बांगड्या हे सौभाग्य अलंकार अर्पण करावेत.
- वडाला हळद-कुंकू वाहून आंबे आणि दूध-साखरेचा नैवेद्य दाखवावा.
- धागा बांधून सात फेऱ्या मारून प्रार्थना करावी.

**कोणते मंत्र म्हणावे?**

सावित्री ब्रम्हा वादिनी सर्वदा प्रिय भाषिणी।
तेन सत्येनमां पाहि दुःखसंसार सागरात।।

**वटसावित्री व्रतात आपण वटवृक्षाची पूजा का करतो?**

वटसावित्री व्रत दरवर्षी विवाहित स्त्रिया ज्येष्ठ महिन्यातील अमावास्या आणि ज्येष्ठ महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी पाळतात. या व्रतामध्ये सावित्री-सत्यवानाची कथा ऐकली जाते आणि वट म्हणजेच वटवृक्षाचीही पूजा केली जाते. स्त्रिया हे व्रत सौभाग्यासाठी पाळतात.

# वटपौर्णिमेला दोरा का बांधतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




वटपौर्णिमेला वडाच्या झाडाला दोरा (सूत) गुंडाळण्याची परंपरा खूप जुनी आहे. सामान्यत: 'पतीला दीर्घायुष्य मिळावे आणि सात जन्माचा सोबती मिळावा' म्हणून हा दोरा बांधला जातो, हे आपल्या सर्वांना माहीत आहे. पण या धार्मिक कारणाव्यतिरिक्त बहुतेकांना माहिती नसलेली काही वैज्ञानिक, आध्यात्मिक आणि सामाजिक कारणे या परंपरेमागे आहेत. ती खालीलप्रमाणे-

**१) वैज्ञानिक कारण :**
**प्राणवायूचे कवच आणि आरोग्य**

वटवृक्ष (वडाचे झाड) हा २४ तास सर्वाधिक ऑक्सिजन देणाऱ्या झाडांपैकी एक आहे.

**ऊर्जेचे संवर्धन :** वडाच्या झाडातून सातत्याने बाहेर पडणारी सकारात्मक आणि आरोग्यदायी ऊर्जा दोऱ्याच्या फेऱ्यांमुळे एका जागी केंद्रित किंवा संवर्धित होण्यास मदत होते, अशी प्राचीन समजूत आहे.

**आरोग्य रक्षण :** जेव्हा महिला वडाभोवती प्रदक्षिणा घालतात आणि सूत बांधतात, तेव्हा त्यांना मोठ्या प्रमाणात शुद्ध ऑक्सिजन मिळतो, जो त्यांच्या आरोग्यासाठी, विशेषत: फुफ्फुसांच्या कार्यक्षमतेसाठी अत्यंत फायदेशीर ठरतो.

**२) आध्यात्मिक कारण : त्रिदेवांचे वास्तव्य आणि सूत्राचे बंधन**

हिंदू धर्मात वडाच्या झाडाला अत्यंत पवित्र मानले गेले आहे, कारण त्यात ब्रह्मा, विष्णू आणि महेश (शिव) या त्रिदेवांचा वास असतो, असे मानले जाते.

**सूत किंवा दोरा हे 'सूत्राचे' (धाग्याचे) प्रतीक आहे :** ज्याप्रमाणे कापसाचा कच्चा धागा एकत्र आल्यावर मजबूत बनतो, त्याचप्रमाणे पती-पत्नीचे नातेही एकमेकांशी जोडले जाऊन अधिक मजबूत व्हावे, हा यामागचा आध्यात्मिक हेतू आहे.

**त्रिगुणांचे संतुलन :** दोऱ्याचे तीन फेरे किंवा सात फेरे मारताना शरीरातील सत्व, रज आणि तम या गुणांचे संतुलन राखले जाते, अशीही एक धारणा आहे.

**३) 'प्रकृती आणि पुरुष' यांच्यातील कृतज्ञता**

**निसर्गाचे ऋण :** वटवृक्ष शेकडो वर्षे जगतो. तो कडक उन्हात सावली देतो, हजारो पक्ष्यांना आश्रय देतो आणि पर्यावरणाचे रक्षण करतो. वडाला धागा बांधणे म्हणजे "आम्ही या निसर्गाशी, या जीवनदायी वृक्षाशी बांधलेले आहोत" ही कृतज्ञता व्यक्त करण्याची ती एक पद्धत आहे. पतीच्या दीर्घायुष्यासोबतच आपल्या कुटुंबाला वडासारखीच विशालता आणि स्थिरता मिळावी, म्हणून हा धागा कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून बांधला जातो. वटपौर्णिमेला वडाला दोरा बांधणे म्हणजे केवळ एक अंधश्रद्धा किंवा निव्वळ परंपरा नाही; तर तो आरोग्य, निसर्गाप्रती असलेली कृतज्ञता आणि वैवाहिक जीवनातील मजबूत बंध साजरा करण्याचा एक सुंदर सोहळा आहे.









# वटसावित्री पौर्णिमा : सातजन्मांची सोबत

## श्रद्धेचा धागा आणि वडाच्या फेऱ्यांमागील शास्त्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वटसावित्री पौर्णिमा म्हणजे घराघरांमध्ये सणावाराचा उत्साह असतो. नटून-थटून, हातात पूजेचे ताट घेऊन जेव्हा आपण वडाच्या झाडाजवळ जातो तेव्हा केवळ एक विधी म्हणून नव्हे; तर एका महान प्रेमाच्या आणि दृढसंकल्पाच्या कथेची आपण उजळणी करत असतो.

या पावन दिवशी या व्रताची ती अलौकिक 'कथा'आणि आपण मारतो त्या 'फेऱ्यांमागील शास्त्र' नक्की काय आहे, हे सविस्तर जाणून घेऊया. सावित्री आणि सत्यवानाची ही कथा केवळ पतीच्या प्राणांसाठी यमराजाशी लढणाऱ्या एका स्त्रीची नाही, तर ती बुद्धी, चातुर्य आणि अतूट विश्वासाची कहाणी आहे.

राजकन्या सावित्रीने अल्पायुषी असलेल्या सत्यवानाची पती म्हणून निवड केली. लग्नानंतर काही काळातच तो दिवस आला, जेव्हा सत्यवानाचे प्राण घेण्यासाठी स्वतः यमराज धरतीवर आले. सत्यवानाचे प्राण घेऊन जेव्हा यमराज दक्षिण दिशेला जाऊ लागले, तेव्हा सावित्रीही त्यांच्या मागे चालत राहिली. यमराजांनी तिला अनेकदा मागे फिरण्यास सांगितले; पण सावित्रीने आपल्या बुद्धीच्या आणि पातिव्रत्याच्या बळावर यमराजांशी संवाद साधला. तिच्या त्या थोर विचारांनी आणि निष्ठेने प्रसन्न होऊन यमराजांनी तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने अत्यंत चातुर्याने सासू-सासऱ्यांचे डोळे, त्यांचे हरवलेले राज्य आणि शेवटी 'शंभर पुत्रांची माता होण्याचा'वर मागून घेतला. यमराजांनी तथास्तू म्हटले आणि तिथेच यमराज आपल्याच वचनात अडकले! पतीच्या प्राणांशिवाय सावित्री माता कशी होणार? शेवटी हार मानून यमराजांना सत्यवानाचे प्राण परत करावेच लागले. तो काळ वडाच्या झाडाखालीच व्यतीत झाला होता, म्हणूनच वडाचे झाड या अखंड सौभाग्याचे आणि विजयाचे साक्षीदार बनले.

पूजा करताना आपण वडाच्या झाडाला सुती धागा गुंडाळत प्रदक्षिणा (फेऱ्या) मारतो. शास्त्रानुसार आणि श्रद्धेनुसार या फेऱ्यांचे विशेष महत्त्व आहे.

१०८ फेऱ्या (सर्वोत्तम) हिंदू धर्मशास्त्रात '१०८' ही संख्या पूर्णतेचे आणि विश्वाच्या ऊर्जेचे प्रतीक मानली जाते. शक्य असल्यास १०८ फेऱ्या मारणे सर्वांत श्रेष्ठ मानले जाते.



**७ किंवा २१ फेऱ्या (पर्यायी) :**

जर वेळ किंवा आरोग्यामुळे शक्य नसेल, तर ७ फेऱ्या (लग्नातील सात फेऱ्या आणि सात जन्मांच्या सोबतीचे प्रतीक) किंवा ११, २१ फेऱ्या मारल्या जातात. वडाचे झाड हे सर्वाधिक ऑक्सिजन देणारे आणि वातावरणातील नकारात्मकता शोषून घेणारे झाड मानले जाते. जेव्हा आपण मनोभावे त्या झाडाभोवती फेऱ्या मारतो, तेव्हा आपल्याला मोठ्या प्रमाणात शुद्ध वायू (ऑक्सिजन) मिळतो. ज्यामुळे मनाला आणि शरीराला एक नवी ऊर्जा मिळते. तो कच्चा धागा म्हणजे पती-पत्नीच्या नात्यातील प्रेमाची वीण घट्ट असण्याचे प्रतीक आहे.

## काय आहे ७ जन्माचे रहस्य?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुळात या ७ जन्म मागणीत पुढच्या जन्माचा संबंधच नाही. तो होणार का नाही? माहिती नाही. माणसाचा मिळेल का? माहिती नाही. हीच पुन्हा ओळखायची कशी? अशा निरर्थक बाबी आपल्या शास्त्रात नाहीत.

**मग काय आहे ७ जन्म?**

- ही शुद्ध जीवशास्त्रीय भूमिका आहे.
- शरीरविज्ञान सांगते, की आपल्या शरीराची रचना राज्यसभेसारखी असते. काही पेशी मरतात, तर काही नवीन जन्माला येतात.
- शरीर सतत बदलत असते आणि तरीही अखंड वाटते.
- या शरीरातील एकूण एक पेशी बदलायला काळ लागतो १२ वर्षे. म्हणून तप करायचे १२ वर्षे.
- १२ वर्षांनी आपले शरीर पूर्ण बदलत असते. जणू एक नवा जन्म.
- असे सात जन्म म्हणजे १२७=८४.
- पूर्वी १६ व्या वर्षी लग्न व्हायचे.
- त्यावेळी ती नवविवाहिता प्रार्थना करायची की सात जन्म हाच पती मिळो अर्थात पती १६+८४=१०० वर्षे जगो.
- पतीच्या शतायुत्वाची कामना आहे सात जन्म.
- पुढच्या जन्माचा काहीही संबंध नाही.

# सावित्री आणि वटपौर्णिमा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी महिला वटपौर्णिमेचा सण साजरा करतात. महिलांच्या आयुष्यात महत्त्वाच्या असणाऱ्या आजच्या वटपौर्णिमा सणानिमित्त वटवृक्षाला संस्कृतमध्ये 'अक्षयवृक्ष' असे म्हटले जाते. 'अ' म्हणजे नाही आणि 'क्षय' म्हणजे विनाश! ज्याचा कधीही विनाश होत नाही अर्थात जो पुन्हा जीवंत होतो, वाढत जातो तो अक्षय वृक्ष म्हणजेच वटवृक्ष! वटवृक्षाचे खोड रुंद असते. त्याच्या फांद्या खूप विस्तारित असतात, त्याला फुटणाऱ्या पारंब्या जमिनीच्या खोल भागात जातात आणि त्याला मुळे फुटून पुन्हा वटवृक्ष तयार होतो. या वृक्षाच्या रुंद विस्तारात शेकडो पक्षी आपली घरटी बनवून वास्तव्य करतात. अनेक जनावरे ऊन-पावसात सावलीचा आश्रय घेतात. फार पूर्वी आणि आजही खेड्यातून बैलगाडीने किंवा पायी प्रवास करणारे शेकडो पांथस्थ या वटवृक्षाखाली निद्राधीन होऊन विश्रांती घेतात. अशा या परोपकारी वटवृक्षाचे महत्त्व आमच्या संस्कृतीसंरक्षक पूर्वजांनी 'वटपौर्णिमा' या दिनाच्या निमित्ताने समाजापुढे आणून प्रस्थापित केले आहे. ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमेलाच या ज्ञानी लोकांनी 'वटपौर्णिमा' हे नामाभिधान दिले आहे. भारतीय स्त्रिया या दिवसाच्या एक दिवस आधी आणि एक दिवस नंतर असे मिळून तीन दिवस वटपौर्णिमेचे व्रत करतात. पौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया नववस्त्र व अलंकार परिधान करून वृक्षाची पूजा मनोभावे करतात. हळदी-कुंकू, फुले आणि या ऋतूतील फळांचा नैवेद्य दाखवितात आणि 'अक्षय सौभाग्या'साठी प्रार्थना करतात. स्त्रिया परस्परांना सौभाग्यवाण म्हणून खण, नारळ, फळे, बांगड्या असे दान करतात आणि संपूर्ण दिवस उपवास करतात. सत्यवान-सावित्रीची कथा वाचतात. दुसऱ्या दिवशी उपवासाचे पारणे म्हणून गरीब,

ब्राह्मणाला भोजन देतात व गरजूंना धनदान करतात.

या वटपौर्णिमेशी निगडित मूळ महाभारतातील एक कथा जनमनात आजही प्रचलित आहे. भद्रदेशाचा आदर्श राजा अश्वपती याला सावित्री नावाची एक सुंदर, सुविद्य कन्या होती. ती उपवर होताच राजाने तिला आपला पती स्वतःच निवडण्याविषयी सांगितले. महाभारतकालीन हे भारतीय स्त्री-स्वातंत्र्य नाही का? सावित्रीने द्युमत्सेनाचा पुत्र सत्यवान याची निवड केली. कारण तो पितृभक्त, बुद्धिमान आणि गुणरूपसंपन्न होता, परंतु त्याचा पिता राजा द्युमत्सेन शत्रूकडून पराजित होऊन त्यावेळी राज्य गमावून जंगलात राहात होता. शिवाय ती पती-पत्नी दोघेही आंधळी होती, इतकेच नव्हे तर नारदमुनींच्या सांगण्यानुसार सत्यवान अल्पायुषी होता. तरीदेखील सावित्रीने एकदा मनाने त्यालाच वरले असल्यामुळे हा विवाह झाला. त्यानंतर सावित्रीने वनात साध्या वेषात राहून आपल्या या तीन व्यक्तींची मनोभावे सेवाशुश्रूषा सुरू केली. एकेदिवशी सत्यवानासह जंगलात लाकडे तोडायला गेली असता यमधर्माने त्याचे प्राण हरण केले. त्यावेळी सावित्रीने धीटपणाने सतत तीन दिवस त्याच्याशी युक्तिवाद आणि शास्त्रचर्चा केली. तेव्हा त्या यशस्विनीला यमाने 'तीन वर'मागण्यास सांगितले, मात्र सत्यवानाचे प्राण वगळता तेव्हा सावित्रीने आपल्या सासू-सासऱ्यांनी गमावलेली दृष्टी, त्यांचे राज्य आणि स्वतःसाठी एक पुत्र मागितला आणि अनावधानाने यमदेवांनी 'तथास्तु' म्हटले. अर्थात त्यामुळे सत्यवानाचे प्राण परत आले. पुढे सत्यवान-सावित्री या पुण्यलोक दाम्पत्याने सदाचाराने ऐश्वर्यवान बनून प्रदीर्घ काल लोककल्याणकारी राज्य केले. म्हणून सावित्री म्हणजे पातिव्रत्याचे प्रतीक ठरले.

वटवृक्ष हा एक औषधी वृक्ष आहे. त्याच्या सालींपासून अनेक रोगांवर गुणकारी औषधे बनविली जातात. पावसाळ्याच्या सुरूवातीला वटवृक्षाच्या पानांमधून थॉरिअस नावाचा एक द्रव पाझरतो. त्यामुळे स्त्रियांचे विविध प्रकारचे गर्भाशयासंबंधीचे विकार दूर होतात. बहुधा त्यामुळे हे व्रत ज्येष्ठ महिन्यात करण्याचे वैज्ञानिक पूर्वषींनी ठरविले असावे. वटवृक्ष हा २४ तास प्राणवायू सोडणारा वृक्ष आहे, हे विज्ञानशास्त्रानेही मान्य केले आहे. बहुधा त्याचाही समावेश सत्यवानाचे प्राण परत येण्यात असणे शक्य आहे.

'नास्ति मूलं अन्नौषिधम' = कोणतीही वनस्पती ही अनौषधी नसते. अर्थात प्रत्येक वनस्पतीत काही ना काही औषधी गुण असतोच, हे आमच्या पूर्वजांनी संशोधन करून जाणले होते. म्हणूनच वटवृक्षासारख्या महान गुणकारी वृक्षाचा गौरव करण्यासाठी या व्रताची वटवृक्षाशी सांगड घातली असावी. सामान्यजनांच्या समजुतीसाठी या पौराणिक कथेचा आधार घेऊन त्याचे एका व्रतात रुपांतर करण्यात आले; परंतु त्या अनुषंगाने महाभारतकालीन भारतीय स्त्रीचे व्यक्तिमत्त्वही प्रतीत होते एवढे निश्चित!

# वटपौर्णिमेला 'या' ५ चुका करूच नका!

## व्रताचे पुण्यफळ कमी होण्याची शक्यता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वटसावित्री म्हणजेच वटपौर्णिमेचे व्रत हे सुवासिनींसाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे मानले जाते. पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुखी संसारासाठी महिला हे व्रत मनोभावे करतात. मात्र, शास्त्रांनुसार या दिवशी काही गोष्टींची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. वटपौर्णिमेच्या पूजेदरम्यान नकळत होणाऱ्या काही चुकांमुळे व्रताचे पुण्यफळ कमी होण्याची शक्यता. चला तर मग जाणून घेऊया वटपौर्णिमेला कोणत्या ५ चुका अजिबात करू नयेत.



**काळ्या किंवा पांढऱ्या रंगाचे कपडे आणि बांगड्या वापरणे**

**चूक :** हिंदू धर्मात पांढरा आणि काळा रंग हा कोणत्याही शुभ किंवा धार्मिक कार्यात अशुभ मानला जातो.

**नियम :** वटपौर्णिमेच्या दिवशी सुवासिनींनी चुकूनही काळ्या किंवा पांढऱ्या रंगाची साडी, कुर्ती किंवा बांगड्या घालू नयेत. या दिवशी लाल, हिरवा, पिवळा किंवा गुलाबी यांसारख्या सौभाग्यकारक रंगांचे कपडे परिधान करावेत.

**अपूर्ण किंवा शिळे साहित्य पूजेत वापरणे**

**चूक :** घाईघाईत पूजेची तयारी करताना आदल्या दिवशीचे किंवा शिळे साहित्य वापरणे टाळावे. तसेच सुवासिक नसलेली सुकी फुले पूजेत वापरू नयेत.

**नियम :** वटवृक्षाची पूजा करताना ताजी फुले, सुवासिक अगरबत्ती, नवीन सुती धागा (सूत) आणि ताजी फळे (जसे की आंबे, फणस) वापरावीत. अपूर्ण किंवा अशुद्ध साहित्यामुळे पूजेचे पुण्य कमी होते.

**वडाच्या झाडाची फांदी तोडून घरी पूजा करणे**

**चूक :** अनेकदा वेळेअभावी किंवा गर्दी टाळण्यासाठी अनेक महिला वडाच्या झाडाची फांदी तोडून आणतात आणि घरीच कुंडीत किंवा ताटात ठेवून तिची पूजा करतात.

**नियम :** शास्त्रांनुसार वटवृक्षाची फांदी तोडणे अत्यंत अशुभ मानले जाते. वटपौर्णिमेला थेट वडाच्या झाडापाशी जाऊन तिथेच पूजा करणे आणि प्रदक्षिणा घालणे शास्त्रोक्त मानले जाते. जर अपवादात्मक परिस्थितीत बाहेर जाणे शक्य नसेल, तर फांदी तोडण्याऐवजी वडाचे चित्र काढून किंवा मातीचा वटवृक्ष तयार करून पूजा करावी.

**सुवासिनींना रिकाम्या हाताने परत पाठविणे**

**चूक :** वटपौर्णिमेच्या दिवशी घरात येणाऱ्या इतर सुवासिनींचा अनादर करणे किंवा त्यांना काहीही न देता घरी पाठविणे योग्य मानले जात नाही.

**नियम :** या दिवशी वाण (वाण पुजणे) देण्याला विशेष महत्त्व आहे. तुमच्या घरी येणाऱ्या सुवासिनीला हळद-कुंकू लावून, खण-नारळ किंवा किमान एखादे फळ तरी वाण म्हणून नक्की द्यावे. तिची ओटी भरावी. यामुळे घरात सुख-समृद्धी नांदते.

**मनात राग, द्वेष किंवा घरात वाद घालणे**

**चूक :** उपवास करताना किंवा पूजा करताना मनात कोणाबद्दलही राग, मत्सर असणे किंवा पतीसोबत वाद घालणे याने व्रताचे पूर्ण पुण्य नष्ट होते.

**नियम :** हे व्रत पतीच्या प्रेमासाठी आणि दीर्घायुष्यासाठी केले जाते, त्यामुळे या दिवशी घरात आनंदी वातावरण ठेवावे. मनामध्ये सात्विक विचार ठेवावेत आणि कोणाचीही निंदा-नालस्ती करू नये. वटवृक्षाला प्रदक्षिणा घालताना (साधारण ५, ७ किंवा ११ वेळा) सूत गुंडाळताना ते मधूनच तुटणार नाही याची काळजी घ्या. जर सूत तुटले, तर तिथेच नमस्कार करून पुन्हा नवीन सूत जोडून प्रदक्षिणा पूर्ण कराव्यात.

# ज्येष्ठ मास की पूर्णिमा पर राशिनुसार करें ये उपाय

## मिलेगी शिव और चंद्रदेव की कृपा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सनातन धर्म में ज्येष्ठ मास की पूर्णिमा का बहुत अधिक धार्मिक और आध्यात्मिक महत्व है। जब ज्येष्ठ पूर्णिमा सोमवार के दिन पड़ती है, तो इसका महत्व कई गुना बढ़ जाता है, क्योंकि सोमवार का दिन स्वयं देवों के देव महादेव और चंद्र देव को समर्पित है। इस शुभ संयोग पर लक्ष्मी-नारायण के साथ-साथ भगवान शिव और चंद्र देव की पूजा करने से जीवन के सभी कष्ट दूर होते हैं।

ज्येष्ठ महीने की पूर्णिमा का ज्योतिषीय दृष्टि से विशेष महत्व माना जाता है। जब पूर्णिमा का संयोग सोमवार के साथ बनता है, तब इसका महत्व और भी बढ़ जाता है। इस शुभ अवसर पर भगवान शिव और चंद्रदेव की पूजा करने से मनोकामनाएं पूर्ण होने, मानसिक शांति मिलने और जीवन में सुख-समृद्धि आने की मान्यता है। अपनी राशि के अनुसार यहां ज्येष्ठ पूर्णिमा पर नीचे दिए गए विशेष उपाय करने से सुख, समृद्धि और मानसिक शांति की प्राप्ति होती है।

### मेष

**उपाय :** इस दिन भगवान शिव का कच्चे दूध और शहद से अभिषेक करें।

**लाभ :** ऐसा करने से आपके साहस में वृद्धि होगी और कार्यक्षेत्र में आ रही बाधाएं दूर होंगी।

### वृषभ

**उपाय :** चंद्र देव को प्रसन्न करने के लिए दूध, दही, सफेद चंदन या मिश्री का दान करें। शाम के समय चांदी के पात्र से चंद्रमा को अर्घ्य दें।

**लाभ :** आर्थिक स्थिति मजबूत होगी और मानसिक तनाव से मुक्ति मिलेगी।

### मिथुन :

**उपाय :** पूर्णिमा के दिन भगवान सत्यनारायण की कथा सुनें या पढ़ें और उन्हें पीले फल व तुलसी दल अर्पित करें।

**लाभ :** व्यापार में उन्नति होगी और रुके हुए काम तेजी से पूरे होंगे।

### कर्क

**उपाय :** कर्क राशि के स्वामी स्वयं चंद्र देव हैं। इस दिन शिव मंदिर में जाकर शिवलिंग पर अक्षत (साबुत चावल) चढ़ाएं और '**ॐ नमः शिवाय**' का जप करें।

**लाभ :** स्वास्थ्य में सुधार होगा और भावनाओं पर नियंत्रण रखने में मदद मिलेगी।

### सिंह

**उपाय :** जल में गंगाजल और लाल चंदन मिलाकर शिवलिंग पर अर्पित करें। इसके बाद गरीब या जरूरतमंद लोगों को गेहूं या गुड़ का दान करें।

**लाभ :** मान-सम्मान और सामाजिक प्रतिष्ठा में भारी वृद्धि होगी।

### कन्या

**उपाय :** मां लक्ष्मी को खीर का भोग लगाएं और उसमें तुलसी का पत्ता जरूर डालें। कन्याओं को दूध से बनी मिठाई खिलाएं।

**लाभ :** घर में सुख-समृद्धि का वास होगा और धन से जुड़ी समस्याएं समाप्त होंगी।

### तुला

**उपाय :** पूर्णिमा की रात को चंद्रमा की रोशनी में बैठकर 'ॐ सों सोमाय नमः' मंत्र का १०८ बार जप करें। शिव जी को सफेद फूल चढ़ाएं।

**लाभ :** वैवाहिक जीवन में मधुरता आएगी और मानसिक शांति का अनुभव होगा।

### वृश्चिक

**उपाय :** शिवलिंग पर दूध, दही, घी, शहद, चीनी से तैयार किया गया पंचामृत चढ़ाएं और हनुमान चालीसा का पाठ करें।

**लाभ :** अज्ञात भय, शत्रु बाधा और कर्ज से मुक्ति मिलेगी।

### धनु

**उपाय :** शिव मंदिर में एक घी का दीपक जलाएं और चने की दाल या बेसन के लड्डुओं का दान करें।

**लाभ :** भाग्य का पूरा साथ मिलेगा और उच्च शिक्षा व करियर में सफलता प्राप्त होगी।

### मकर

**उपाय :** काले तिल पानी में मिलाकर शिवलिंग का अभिषेक करें और बहते जल में सूखे नारियल प्रवाहित करें।

**लाभ :** शनि जनित दोषों (साढ़ेसाती या ढैय्या) का प्रभाव कम होगा और कार्यों में आ रही अड़चनें दूर होंगी।

### कुंभ

**उपाय :** पीपल के वृक्ष के नीचे घी का दीपक जलाएं और शिवलिंग पर गन्ने का रस या शुद्ध जल अर्पित करें।

**लाभ :** आर्थिक तंगी से राहत मिलेगी और पारिवारिक क्लेश समाप्त होंगे।

### मीन

**उपाय :** भगवान विष्णु और माता लक्ष्मी की संयुक्त पूजा करें। शिव जी को पीले चंदन का तिलक लगाएं और स्वयं भी धारण करें।

**लाभ :** ज्ञान और अध्यात्म में रुचि बढ़ेगी, साथ ही घर में मांगलिक कार्यों के योग बनेंगे।

**सभी राशियों के लिए १**

**महा-उपाय:** चूंकि पूर्णिमा सोमवार को है, इसलिए इस रात चांदी के बर्तन में गंगाजल, कच्चा दूध और चावल मिलाकर चंद्रमा को अर्घ्य देना हर राशि के जातक के लिए अत्यंत कल्याणकारी रहेगा।

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)